सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ८६ | बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. विजय माहेश्वरी (भोजूशेठ)**
ज्येष्ठ रोटेरीयन, व्यापारी : विजय शॉपी



**श्री. अशोकभाऊ मणियार**
ज्येष्ठ रोटेरीयन व उद्योजक



**श्री. संजयभाऊ कासार**
व्यापारी



**श्री. महेश माळी**
क्रीडा शिक्षक

## दिनविशेष

१७ डिसेंबर

- हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनचे क्रांतिकारक राजेंद्र नाथ लाहिरी यांना ब्रिटीश सरकारने निर्धारित तारखेच्या दोन दिवस आधी गोंडा तुरुंगात फाशी दिली.
- पोलिसांच्या हातून लाला लजपत राय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांनी ब्रिटिश पोलिस ऑफिसर जेम्स सॉंडर्स याची लाहोर येथे हत्या केली, त्यानंतर तिघांना १९३१ मध्ये फाशी देण्यात आली.
- जयंतीलाल छोटालाल शहा यांनी भारताचे १३ वे सरन्यायाधीश म्हणुन पदभार स्वीकारला.
- शरद पवार यांनी एमसीए (मुंबई क्रिकेट असोसिएशन) च्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.
- लेफ्टनंट जनरल बिपिन रावत यांची लष्कर प्रमुख आणि एअर चीफ मार्शल बी.एस. धनोआ यांची हवाई दल प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली.
- आयपीएस ए. के. धस्माना यांची रॉ च्या प्रमुखपदी तर राजीव जैन यांची आयबी च्या प्रमुख पदी नियुक्ती केली.

# थंडीचा जोर वाढला; अमळनेरात पेटल्या शेकोट्या!

## सर्दी, खोकला, श्वसन विकारांच्या रूग्णांमध्येही वाढ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरासह तालुक्यात थंडीचा जोर चांगलाच वाढला आहे. हुडहुडी भरविणाऱ्या थंडीमुळे ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्या आहेत. थंडीपासून बचावासाठी बाजारपेठा, रस्त्याच्या कडेला तसेच कॉलनी, वस्त्यांमध्ये शेकोट्यांभोवती नागरिक ऊब घेताना दिसत आहेत. सर्दी, खोकला आणि श्वसन विकारांच्या रूग्णांमध्येही वाढ झाली आहे. आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य तज्ज्ञांनी केले आहे. थंडीमुळे लहान मुले, वृद्ध व आजारी नागरिकांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. सकाळच्या वेळी शाळकरी मुले, कामगार व शेतकरी उबदार कपडे, स्वेटर, शालींचा आधार घेत घराबाहेर पडताना दिसत आहेत. गरम चहा, कॉफी व सूपला मागणी वाढली आहे. चहा टपऱ्यांवर गर्दी वाढली आहे. थंडीमुळे अनेक जण घराच्या बाहेरही पडत नाहीत. मात्र, बळीराजा थंडीतही गहू, हरभरा व रब्बी पिकांच्या रखवालदारीसाठी रात्री-बेरात्री शेतात जाऊन जागरण करतो. थंडी, ऊन, पाऊस या कुठल्याच गोष्टीचा त्याच्यावर परिणाम दिसून येत नाही. मात्र, तेही शेतात शेकोट्या पेटविताना दिसत आहेत. गेल्या काही वर्षाच्या तुलनेत यंदाची थंडी अधिक तीव्र आहे. हवामानातील बदलामुळे पुढील काही दिवस थंडीचा जोर अजून कायम राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य तज्ज्ञांनी केले आहे.

**तापमानातील बदलाने आरोग्याच्या समस्या**

वातावरणातील बदलामुळे नागरिकांना सर्दी, खोकला, दमा, श्वसनाचे विकार यासारख्या तक्रारी जाणवत आहेत. तापमानातील बदल आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो. विशेषतः श्वसनाचे आजार असणाऱ्यांनी औषधांचा वापर वेळेवर व नियमित करण्याचे आवाहनही तज्ज्ञांनी केले आहे.



## बालपणात आई-वडिलांचे छत्र हरपलेल्या

# नांदेडच्या भावंडांची आकाशाला गवसणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बालपणात आई- वडिलांचे छत्र हरवलेल्या दोन भावंडांनी यशाला गवसणी घातली आहे. मोठा भाऊ इंडियन नेव्हीत, तर छोट्या भावाची इंडियन एअर फोर्समध्ये निवड झाली आहे. या दोन्ही भावंडांचा मामाने सांभाळ केला होता.

आई- वडिलांचे छत्र हरपलेल्या दोन भावंडानी खचून न जाता यशाचे शिखर गाठून स्वप्न साकार केले आहे. जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील नागनाथ मंगनाळे याची अवघ्या २०व्या वर्षी भारतीय हवाई दलात नुकतीच निवड झाली आहे. तर त्याचा मोठा भाऊ साईनाथ मंगनाळे हा नौसेनेत कार्यरत आहे. हवाई दलात भरती होऊन आकाशाला गवसणी घालणारा नागनाथ मंगनाळे हा पहिला भूमिपुत्र ठरला आहे. त्याच्या या यशाचे



सर्वत्र कौतुक होत आहे.

नागनाथ मंगनाळे हा कंधार तालुक्यातील फुलवळ येथील रहिवासी आहे. त्याचे आई- वडील शेतकरी होते. वयाच्या सहाव्या वर्षी वडील संजय मंगनाळे आणि १४ व्या वर्षी आई शिवकांता मंगनाळे यांचे निधन झाले. बालपणात आई-वडिलांचे छत्र हरपल्यानंतर नागनाथ आणि साईनाथ यांना कोण सांभाळणार? हा प्रश्न निर्माण झाला होता. त्यानंतर त्यांचे मामांनी दोघांना आपल्या गावी मुदखेड येथे नेले. त्यांचा सांभाळ करून शिक्षण पूर्ण केले. या कष्टाचे चीज या दोन्ही भावंडानी केले आहे.



# अभ्यासिका नव्हे... ही तर स्मशानभूमी !

## आडाची वाडी येथील विद्यार्थी एकत्रीतपणे दररोज करतात अभ्यास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आडाची वाडी (ता. पुरंदर) या छोट्याशा गावाने अवघ्या काही महिन्यात विकासाची मोठी झेप घेत संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे. गावातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, सामुदायिक उपक्रम या सर्वांसोबत गावाची 'स्मशानभूमी' देखील आधुनिक, सुसज्ज पद्धतीने उभारली आहे. केवळ अंत्यविधीचे ठिकाण म्हणून ओळख असलेली स्मशानभूमी गावकऱ्यांसाठी भेटीगाठीचे, तर मुलांसाठी अभ्यासाचे केंद्र ठरली आहे. हीच आडाची वाडी वेगळी ओळख बनली आहे. सामान्यतः भीती, शांतता आणि ओसाडपणा अशा प्रतिमांनी जोडली जाणारी स्मशानभूमी, आडाचीवाडीत मात्र पूर्णपणे वेगळ्या रूपात दिसते. स्वच्छ परिसर, आकर्षक फुलझाडे, बैठक व्यवस्था, प्रकाशयोजना, पाण्याची सोय यामुळे येथे सतत ग्रामस्थांची वर्दळ दिसते. दुपारचे जेवण उरकल्यावर गावातील अनेक ज्येष्ठ फिरण्यासाठी, गप्पा मारण्यासाठी येथे थांबतात. काहीजण स्मशानभूमीतील सावलीत विसावा घेतात आणि नंतर घरी जातात.

> "आडाचीवाडीतील हा उपक्रम केवळ सौंदर्यीकरणाचा नाही, तर ग्रामभावना मजबूत करणारा आहे. स्मशानभूमीचा हा उपक्रम म्हणजे ग्रामविकासाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी आहे. स्मशानभूमीला अशा सकारात्मक वापराशी जोडणे ही अत्यंत अभिनव कल्पना आहे. मृतसंस्काराच्या ठिकाणालाच शांत, सुरक्षित आणि लोकाभिमुख जागेत रूपांतरित केले, ही खरोखर कौतुकास्पद गोष्ट आहे. मुलांचे इथे अभ्यासासाठी येणे म्हणजे गावाने निर्माण केलेल्या सुरक्षित व निरोगी वातावरणाची साक्ष आहे.
> **- संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी, रायगड**

> "ग्रामविकासाच्या दृष्टीने येथील रहिवासी व रायगडचे उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली आडाची वाडी घेतलेली ही झेप ग्रामस्थांच्या एकत्र प्रयत्नामुळे शक्य झाली आहे. स्मशानभूमीसह गावातील सर्व सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ, सुबक आणि उपयुक्त बनविण्याचा प्रयत्न केला. स्मशानभूमी ही गावाची ओळख नसते. मात्र, ती स्वच्छ- सुसज्ज असेल तर गावाचा आदर वाढतो. वयस्कर ग्रामस्थ या ठिकाणी विरंगुळा, तर मुले इथे अभ्यास करतात, हे पाहून खूप समाधान मिळते.
> **- सुवर्णा बजरंग पवार, सरपंच**

स्मशानभूमीत जाणे म्हणजे भीती नव्हे, शांतता मिळविणे असा अनुभव आहे, असे गावकरी सांगतात. गेल्या काही दिवसांपासून येथील मुले- मुली दररोज सायंकाळी स्मशानभूमीत दोन तास अभ्यास करण्यासाठी एकत्र जमत आहेत. गटागटाने बसून रात्री उशिरापर्यंत अभ्यास करणारी मुलांची ही दृश्ये पाहून येणाऱ्या ग्रामस्थांनाही आनंद होत आहे. स्मशानभूमीत अभ्यास करताना आम्हाला भीती वाटत नाही. उलट शांत वातावरणामुळे अभ्यासावर चांगले लक्ष केंद्रित करता येतो, असे मुलांनी सांगितले.

# वर्णेश्वर महादेव मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची दयनीय अवस्था

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : चोपडा रस्त्यावरील वर्णेश्वर महादेव मंदिराकडे जाणारा रस्ता अत्यंत दयनीय झाला आहे. त्यामुळे भाविकांसह परिसरातील नागरिक दीर्घकाळापासून त्रस्त आहेत. पालिकेने नवीन व दर्जेदार रस्ता करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

वर्णेश्वर महादेव मंदिर हे प्रभाग क्रमांक तीनच्या परिसरात येते. या प्रभागात मोठ्या प्रमाणात दाट वस्ती आहे. या रस्त्यावरुन रोज मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र, रस्त्यावर मोठ- मोठे खड्डे पडले आहेत. डांबरही निघाले आहे. परिसरात गटारींची व्यवस्थाही केलेली नाही. घरातील सांडपाणी थेट रस्त्यावरच साचते. तसेच पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचते. अनेकांच्या दारापुढे नेहमीच चिखल झालेला दिसून येते. परिणामी डासांची उत्पत्ती वाढून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. कचराही साचल्याने दुर्गंधी पसरली आहे. रस्ता अरूंद असल्याने दुचाकी व चारचाकी चालकांना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागते. या परिसरात मजूर वर्गाचा मोठा रहिवास आहे. त्यांची परिस्थिती हलाकीची आहे. त्यातच रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे त्यांना अनेक त्रासांना सामोरे जावे लागत आहे. वाहनांच्या धुळीमुळे श्वसनाचे विकार, डोळ्यांची जळजळ, त्वचारोग आदींनी परिसरातील रहिवासी त्रस्त आहेत. काही वाहने थेट घरासमोर येऊन थांबत असल्याने लहान मुले, महिला व वृद्धांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)


# मतभेद असावे, मनभेद नसावे...!

## ना. भुजबळांवरील शस्त्रक्रियेनंतर बाळा नांदगावकरांनी घेतली भेट, पोस्ट शेअर करत म्हणाले, 'प्रवाहाविरोधात जाऊन लढणारे...'



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ज्येष्ठ नेते बाळा नांदगांवकरांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री ना. छगन भुजबळ यांची भेट घेतल्यानंतर एक पोस्ट शेअर केली आहे, ती पोस्ट सध्या राजकीय वर्तुळात चर्चेत आली आहे.



ना. भुजबळ यांची प्रकृती सध्या बिघडलेली आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. २८ ऑक्टोबर रोजी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी ना. भुजबळ यांना नियमित तपासणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, असे

पान ३ वर

### ही भेट खरच खास आहे...!

ना. श्री.भुजबळ यांनी शिवसेना सोडून कॉंग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत ते त्यांच्या मुंबई येथील माजगाव मतदारसंघातून निवडणूक लढवित होते. त्यावेळी बाळा नांदगावकर हे एका चाळीत राहाणारे सामान्य शिवसैनिक होते. (स्व.) बाळासाहेब ठाकरे यांनी ना. श्री. भुजबळ यांच्या विरोधात श्री. नांदगावकर यांना शिवसेनेची उमेदवारी दिली होती. ना. श्री. भुजबळ विजयी व्हावेत, म्हणनुनच त्यांच्या विरोधात शिवसेनेतील कोणतेही पद नसलेले श्री. नांदगावकर यांच्यासारख्या सामान्य शिवसैनिकाला उमेदवारी दिली. ही काही तरी मोठी राजकीय खेळी आहे, असा आरोप तेव्हा (स्व.) बाळासाहेब ठाकरे यांच्यावर झाला होता. या आरोपाला उत्तर देताना (स्व.) बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले, होते की माझा कट्टर आणि सामान्य शिवसैनिकही भुजबळांना भारी पडू शकतो, हेच मला दाखवून द्यायचे आहे. या निवडणुकीत नांदगावकरच विजयी होतील, असा दावाही त्यांनी केला होता. सदर निवडणूक कमालीची चुरशीची झाली होती आणि त्यात नांदगावकर विजयी झाले होते. त्यामुळे त्यांना जायंट किलर हे बिरूद मिळाले होते. या निवडणुकीमुळे ना. श्री. भुजबळ व श्री. नांदगावकर यांच्यात दीर्घकाळ संबंध ताणले गेले होते. त्या पार्श्वभूमीवर नुकतीच झालेली दोघांची भेट विशेष मानली जाते.

## खा. शि. मंडळाची निवडणूक

# चौथ्या दिवशी ११ उमेदवारी अर्ज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेश शिक्षण मंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी मंगळवार, दि. १६ डिसेंबर रोजी ११ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. आतापर्यंत एकूण ५३ अर्जांची विक्री झाली आहे.


अध्यक्ष पदासाठी अक्षय नंदकिशोर अग्रवाल, अनिल मधुकर पाटील. उपाध्यक्ष पदासाठी संदीपकुमार केवलचंद जैन, मनिषा विवेकानंद लाठी. विश्वस्त पदासाठी संदीपकुमार केवलचंद जैन. कार्यकारी मंडळ सदस्य पदासाठी दिलीप हरकचंद जैन, डॉ. अविनाश रघुनाथ जोशी, कल्याणराव वामनराव पाटील, मनिषा विवेकानंद लाठी, जितेंद्र शांतीलाल झाबक, विठोबा आनंदा धनगर यांनी अर्ज दाखल केले आहेत.

निवडणूक उपसमितीचे चेअरमन पंडित चौधरी, सदस्य विवेकानंद भांडारकर, मनोहर महाजन, प्रा. डॉ. सुनील गरूड, खानदेश शिक्षण मंडळाचे चिटणीस प्रा. पराग पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, राकेश निळे, भटू चौधरी निवडणुकीचे कामकाज पाहत आहेत.

# कमी पाणी पिण्यामुळे मूत्रपिंडाच्या आजाराचा धोका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : हिवाळ्यात तापमान घसरताच शरीरातील अंतर्गत उष्णता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न सुरू होतो. या प्रक्रियेमुळे घामाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे अनेक जण दिवसभर भरपूर काम करत असूनही पाणी पिण्याकडे दुर्लक्ष करतात. थंडीमध्ये पाणी कमी पिण्याची सवय दिसायला छोटी गोष्ट वाटली, तरी त्याचे दुष्परिणाम मोठे असू शकतात. विशेषतः किडनीच्या कार्यक्षमतेवर



याचा ताण पडतो. मूत्रपिंडाशी संबंधित आजार वाढण्याचा धोका आहे. हिवाळ्यात पाणी पिण्याचे प्रमाण कमी होऊ देऊ नये, असा सल्ला वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिला आहे.

**या आजारांचाही धोका**

पाणी कमी घेतल्यामुळे यूटीआयचा थोका वाढतो. मूत्र कमी झाल्याने जंतू बाहेर पडत नाहीत. किडनी स्टोन बनण्याचे प्रमाणही थंडीत अधिक आढळते. कारण पाण्याचे प्रमाण कमी असल्याने खनिजे जमा होतात. दीर्घकाळ दुर्लक्ष झाल्यास किडनी निकामी होण्याचा धोका वाढू शकतो.

**हिवाळ्यात तहान होते कमी**

थंडी अनुभवली की त्वचेतील रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. या आकुंचनामुळे घामाचे प्रमाण घटते. शरीरातील हायड्रेशन संतुलित असल्याचा मेंदूला संदेश मिळतो आणि त्यामुळे तहान कमी लागते. अनेकदा दिवसभर व्यस्त राहिल्याने तहान लागत नाही आणि पाणी पिणे चुकते. थंडीमध्ये बसून काम करणाऱ्यांना तर तहान अजून कमी लागते. त्याचे कारण म्हणजे शरीर ऊर्जा जतन करत असते. हे सर्व घटक मिळून हिवाळ्यात पाण्याचे नैसर्गिक सेवन कमी होते.



# गरीबी में पला-बढ़ा लड़का बना आयएएस अधिकारी!



## सक्सेस स्टोरी...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संघ लोक सेवा आयोग की सिविल सेवा परीक्षा देश की सबसे कठिन परीक्षाओं में से एक मानी जाती है। हर साल लाखों उम्मीदवार इसका हिस्सा बनते हैं, लेकिन सफलता कुछ ही को मिलती है। हालांकि, यह परीक्षा असंभव नहीं है।

अगर आपके पास लक्ष्य के प्रति जुनून, निरंतरता और सही रणनीति है, तो मंज़िल पाना संभव है। ऐसी ही प्रेरणादायक कहानी है मध्य प्रदेश के निरीश राजपूत की, जिन्होंने गरीबी और संघर्ष के बीच अपने सपने को साकार करते हुए आयएएस अधिकारी बनने का गौरव हासिल किया।

**गरीबी में बीता बचपन, फीस भरने के लिए बेचा अखबार**

निरीश राजपूत का जन्म मध्य प्रदेश के भिंड जिले के एक बेहद साधारण परिवार में हुआ। उनके पिता दर्जी का काम करते थे और मुश्किल से परिवार का गुज़ारा चलता था। आर्थिक तंगी इतनी थी कि निरीश को अपनी पढ़ाई जारी रखने के लिए खुद कमाई करनी पड़ी। उन्होंने अखबार बेचकर स्कूल की फीस भरी और पिता का हाथ बंटाया।

**सरकारी स्कूल से पढ़ाई, ग्वालियर में पूरी की डिग्री**

निरीश ने अपनी शुरुआती पढ़ाई एक सरकारी स्कूल से की। आगे की पढ़ाई के लिए वे ग्वालियर चले गए, जहां उन्होंने स्नातक और फिर स्नातकोत्तर की डिग्री पूरी की। पढ़ाई के दौरान उन्होंने उधार लिए नोट्स से तैयारी की, क्योंकि किताबें खरीदने की भी आर्थिक क्षमता नहीं थी। इसी दौरान उन्होंने ठान लिया कि वे UPSC परीक्षा पास कर देश की सेवा करेंगे।

**शिक्षक बनकर किया संघर्ष, फिर भी नहीं छोड़ी उम्मीद**

यूपीएससी की तैयारी के दौरान आर्थिक मदद के लिए निरीश ने एक कोचिंग संस्थान में शिक्षक के रूप में नौकरी की। लेकिन दो साल बाद अचानक नौकरी चली गई। इस झटके से वे कुछ समय के लिए परेशान जरूर हुए, पर हार नहीं मानी। वे दिल्ली चले गए और बिना कोचिंग के तैयारी शुरू कर दी।

**उधार नोट्स से पढ़ाई और १८ घंटे की मेहनत**

निरीश ने कोचिंग सेंटरों में पढ़ रहे छात्रों से दोस्ती की और उनके नोट्स लेकर खुद पढ़ाई की। वे रोज़ाना १८ घंटे तक मेहनत करते थे। कई बार असफलताएं भी झेलीं, लेकिन उन्होंने कभी हार नहीं मानी। उनका मानना था कि "कोशिश कभी बेकार नहीं जाती।"

**चौथे प्रयास में मिली सफलता, ३७० वीं रैंक से बने आयएएस**

कड़ी मेहनत और आत्मविश्वास के बल पर निरीश ने आखिरकार अपने चौथे प्रयास में सफलता हासिल की। उन्होंने ३७० वीं ऑल इंडिया रैंक के साथ यूपीएससी परीक्षा पास की और आयएएस अधिकारी बने। उनकी यह उपलब्धि उन सभी छात्रों के लिए प्रेरणा है जो सीमित संसाधनों के बावजूद बड़े सपने देखने की हिम्मत रखते हैं।



# अक्षय खन्नाने 'धुरंधर' मध्ये घातलेला गॉगल किती महाग?

## कोणती कंपनी बनवते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अभिनेता अक्षय खन्ना याला ' छावा ' नंतर पुन्हा एक जोरदार कम बँक सिनेमा मिळालेला आहे. ' धुरंधर ' या चित्रपटातील त्याचे एन्ट्री साँग खूपच गाजत आहे. या चित्रपटातील त्याच्या काळ्या गॉगलची किंमत किती आहे याची चर्चा सुरु आहे.

अभिनेता अक्षय खन्ना याचा धुरंधर चित्रपट तुफान हिट झाला आहे. या चित्रपटातील त्याचे एन्ट्री साँग (फस्ला) सोशल मीडियावर गाजत आहे. या गाण्याचे अक्षय खन्ना हा काळ्या सुटमध्ये दिसत आहे. जो आपल्या कारमधून शानदार अंदाजात उतरतो. एका छोट्या कार्यक्रमात प्रवेश करतो. सर्व जण त्याचे स्वागत करतात. सर्वांना सलाम करत तो मस्त अंदाजात नाचतो. हा चित्रपट पाहताना त्याच्या स्टायलिश गॉगलकडे चाहत्यांचे लक्ष वेधले केले आहे. या गॉगलची किंमत काय आहे आणि कोणती कंपनी त्याला तयार करते ? याची उत्सुकता चाहत्यांना लागली आहे.

**गॉगलची किंमत काय ?**

इंटरनेटवर या गॉगलची जास्त माहिती उपलब्ध नाही. मात्र, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म रेडिट वर एका यूजरने अक्षय खन्ना याच्या गॉगलबद्दल प्रश्न विचारला होता. त्या युजरच्या पोस्टवर अनेकांच्या कमेंट आल्या आहेत. काही युजरने सांगितले की हा गॉगल गिगि स्टुडिओज कंपनीचा आहे. रेडिटवर एका यूजरने सांगितले की अक्षय खन्ना याने धुरंधरच्या एण्ट्री गाण्यात गॉगल घातलेला आहे. मात्र, गिगि स्टुडिओज कंपनीने ६६७०/१ मॉडेलचा गॉगलची किंमत सुमारे २५ हजार रुपये इतकी आहे.

**स्पेनची आहे ही कंपनी**

गिगि स्टुडिओज ही स्पेनची कंपनी आहे. ही कंपनी अनेक प्रकारचे चष्मे तयार करते. या कंपनीला आधी गिगि बार्सेलोना नावाने ओळखले जात होते. ही एक फॅमिली कंपनी आहे. या कंपनीची स्थापना १९६२ मध्ये झाली होती. ही कंपनी ४५ देशात आपले प्रोडक्ट विकते. या कंपनीची खास बाब म्हणजे ही कंपनी चष्ट्याची फ्रेम हाताने तयार करते. चष्म्याची एक फ्रेम १०० स्टेपने तयार केली जाते.

**अनेक सेलिब्रिटी करतात वापर**

गिगि स्टुडिओजच्या चष्म्याला जगभरातील अनेक सेलिब्रिटी वापरतात. यात अमेरिकन अभिनेत्री जेसिका बेल, ब्रिटन एक्टर आणि गायक एड वेस्टविक, अमेरिकन मॉडेल आणि अभिनेते एरिन वॉसन आदींचा या समावेश आहे. अक्षय खन्ना याच्या शिवाय भारतीय अभिनेत्री बनिता संधू हिला देखील गिगि स्टुडिओजचा गॉगल घातलेले पाहिले आहे.

# टी- २० मध्ये २८ चेंडूंत शतक!

## कोण आहे ' हा ' भारतीय फलंदाज, ज्याने केला धावांचा वर्षाव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एका दमदार भारतीय फलंदाजाने टी २० क्रिकेटमध्ये धुमाकूळ घातला. त्याने फक्त २८ चेंडूंत शतक ठोकले आहे. या भारतीय फलंदाजाने विरोधी संघाच्या गोलंदाजांना हैराण करून सोडले. कोण आहे हा खेळाडू जाणून घेऊया.

भारतीय क्रिकेटमध्ये काही दिवसांनी एक नवा स्टार उगम पावतो आणि त्याची कामगिरी चाहत्यांना थक्क करते. यापैकीच एक नाव आहे उर्विल पटेल. उर्विलने सय्यद मुश्ताक अली टी २० ट्रॉफी २०२४-२५ मधील त्रिपुराविरुद्धच्या सामन्यात केलेल्या धमाकेदार प्रदर्शनाने संपूर्ण क्रिकेट विश्वाचे लक्ष वेधून घेतले. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी इंदूर येथे झालेल्या सामन्यात उर्विलने फक्त २८ चेंडूंत शतक ठोकले. जे भारतीय टी २० क्रिकेटमध्ये सर्वांत वेगाने ठोकलेले शतक ठरले. या विस्फोटक पारीत त्यांनी ३५ चेंडूत नाबाद ११३ धावा जमवल्या आणि १२ षटकार, ७ चौकार मारत विरोधी संघाचे गोलंदाज बघतच बसले. त्याच्या आक्रमक बॅटिंगमुळे गुजरात संघाला फक्त १०.२ ओव्हरमध्ये ८ विकेटने विजय मिळाला. १५६ धावांचे लक्ष्य सहज पूर्ण झाले.

**उर्विलनंतर अभिषेक शर्मानेही ठोकले शतक**

फक्त काही दिवसांनंतरच ५ डिसेंबर २०२४ रोजी अभिषेक शर्माने मेघालयविरुद्ध सामन्यात उर्विल पटेलच्या रेकॉर्डशी बरोबरी केली. अभिषेकने २८ चेंडूंत शतक ठोकले आणि २९ चेंडूंत नाबाद १०६ धावा केल्या. या खेळीत त्याने ११ षटकार आणि ८ चौकार मारले. ज्यामुळे त्याने टी २० क्रिकेटमधील वेगाने शतक ठोकण्याचा भारतीय रेकॉर्ड उर्विलच्या बरोबरीस आणला.

**डावखुरा फलंदाज**

उर्विल पटेल हा डाव्या हाताचा आक्रमक फलंदाज आणि कुशल विकेटकीपर आहे. तो गुजरात संघासाठी घरेलू क्रिकेट खेळतो. आयपीएस २०२५ सिझनमध्ये त्याला चेन्नई सुपर किंग्ससाठी ३ सामने खेळण्याची संधी मिळाली. उर्विलचा जन्म १७ ऑक्टोबर १९९८ रोजी मेहसाणा, गुजरात येथे झाला. सैयद मुश्ताक अली टी २० ट्रॉफीत त्याने ६ सामन्यांत ७८.७५ सरासरी आणि २९९.९२ स्ट्राइक रेट ने ३१५ धावा जमवल्या. त्याच्या टी २० करिअरमध्ये आता ५७ सामने, १४२५ धावा, ३ शतक आणि

### ४ अर्धशतक यांचा समावेश आहे.

उर्विलची फटकेबाजी आणि आक्रमक शैली हे खेळाडूंसाठी आणि चाहत्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्याच्या कामगिरीमुळे भारतीय टी २० क्रिकेटमध्ये नवीन स्टार आणि आक्रमक फटकेबाज म्हणून त्याची ओळख तयार झाली आहे.



उर्विल पटेल

### जागतिक वेगवान शतकांचा रेकॉर्ड

जागतिक स्तरावर टी २० क्रिकेटमध्ये सर्वात वेगाने शतक ठोकण्याचा रेकॉर्ड साहिल चौहान यांच्याकडे आहे. त्याने १ जून २०२४ रोजी एस्टोनियाच्या संघासाठी साइप्रसविरुद्ध फक्त २७ चेंडूत शतक ठोकले. या सामन्यात साहिलने ४१ चेंडूत १४४ नाबाद धावा जमवल्या. स्ट्राइक रेट ३५१.२१ आणि १८ षटकार व ६ चौकार मारले.

### गोलंदाजांसमोर मिसाईलसारखा हल्ला

उर्विलच्या खेळीत प्रत्येक चेंडू जणू धडाका म्हणून मैदानावर पडत होता. त्रिपुराचे गोलंदाज कोणतीही योजना आखू शकले नाहीत. कोणत्याही चेंडूला त्यांनी प्रतिसाद देणे कठीण झाले. ३२२.८५ च्या स्ट्राइक रेटने खेळताना उर्विलने संपूर्ण सामन्यात विरोधी संघाच्या मनोबलावर मोठा दबाव निर्माण केला. उर्विलच्या या प्रदर्शनामुळे टी २० क्रिकेटमधील आक्रमक फटकेबाजीचे नवे उदाहरण समोर आले. त्याच्या बॅटिंगमुळे खेळपटूंसाठी आणि चाहत्यांसाठी टी २० क्रिकेटमध्ये नवीन उंची



# पृथ्वीवर फक्त माणूसच का बोलू शकतो?

## जगात बोलला गेलेला पहिला शब्द काय होता?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पृथ्वीवरील सजीवसृष्टीत माणूस हा एक अनोखा जीव आहे. तो अनेक बाबतीत इतर प्राण्यांपेक्षा वेगळा आहे. मात्र एक गोष्ट जी फक्त माणसाकडेच आहे. इतर जीवांकडे नाही. ती म्हणजे जटिल भाषा. बोलण्याच्या कलेतून भाषा विकसित झाल्या. या भाषेने माणसाच्या प्रगतीत व मानवी समाजाच्या विकासात मोलाची भूमिका बजावली. किंबहुना माणूस जर बोलू शकला नसता किंवा व्यवस्थित भाषेची निर्मिती करू शकला नसता, तर आजचा आधुनिक माणूस आणि समाज निर्माणच झाला नसता. असे काय कारण आहे, की पृथ्वीवर फक्त माणसालाच बोलता येते आणि भाषा विकसित करता येते? भाषेचा विकास नेमका कसा झाला? याबद्दल जाणून घेऊया.

**सजीवांमध्ये फक्त मानवालाच का बोलता येते?**

तुमच्या गळ्यात वरच्या बाजूला एक छोटंसे हाड असते, त्याला हायॉइड बोन म्हणतात. आपण का बोलतो याचे उत्तर या हाडात दडले आहे. हे हाड जीभेला आधार देते आणि सगळ्या प्राण्यांमध्ये आढळते. त्यामुळेच सर्व प्राण्यांना तोंडातून वेगवेगळे आवाज काढता येतात. मात्र, मानवामध्ये या हाडाची रचना अतिशय खास असते. ज्यामुळे अधिक गुंतागुंतीचे आवाज काढता येतात. भाषेचा वापर शक्य होतो.

ब्राझीलमधील साओ पावलो विद्यापीठातील इन्स्टिट्यूट ऑफ बायोसायन्समधील जेनेटिक्स आणि इव्होलुशनरी बायोलॉजी विभागातील प्राध्यापक डॉ. मर्सिडीज ओकुमुरा म्हणतात, की मानवाचे जे अवशेष सापडले आहेत, त्यांच्या विश्लेषणातून दिसते की किमान १,३५,००० वर्षांपूर्वी मानवी शरीरात भाषा बोलण्याची क्षमता होती. जुन्या डीएनएच्या अभ्यासातून वैज्ञानिकांना भाषेच्या उत्क्रांतीबद्दल माहिती मिळाली आहे. मानवी शरीरातील FOXP२ हे जनुक भाषेच्या उत्क्रांतीशी संबंधित आहे. हे जनुक आजच्या मानवात आहे आणि उत्क्रांतीच्या आधीच्या टप्प्यातही होते. डॉ. ओकुमुरा पुढे म्हणतात, की हे जनुक पाठीचा कणा असलेल्या अनेक सजीवांमध्ये आढळते. ज्यात प्राणी, पक्षी आणि मासे यांचा समावेश आहे. मात्र मानवात या जनुकाचे विशिष्ट म्यूटेशन (बदल) झाले आहे. जे मेंदूतील संभाषण केंद्राचे नियंत्रण करते. युकेतील लीड्स विद्यापीठातील स्टडीज फॉर लिंग्विस्टिक्स आणि फोनेटिक्सच्या संचालक डॉ. डायने नेल्सन म्हणतात, की मानवामध्ये शरीराची रचना आणि आकलन क्षमता यांचा अतिशय विशिष्ट मिलाफ असतो, जो इतर प्राण्यांमध्ये आढळत नाही. त्यामुळेच माणूस गुंतागुंतीची भाषा बोलू शकतो.

**मानवी भाषेच्या उत्पत्तीबद्दलचे विविध सिद्धांत**

माणूस बोलायला का लागला? याबाबत भाषाशास्त्रज्ञांनी अनेक सिद्धांत मांडले आहेत. डॉ. नेल्सन म्हणतात, की भाषेच्या उगमाबाबत अनेक सिद्धांत आहेत. त्यानुसार आपण अभ्यासपूर्ण अंदाज बांधू शकतो.

**हातवाऱ्यांचा सिद्धांत :** सुरूवातीला माणूस हातवाऱ्यांनी संभाषण करू लागला.

अवजार निर्मितीचा सिद्धांत : अवजारे बनविण्याची आकलन क्षमता शब्दांना जोडून वाक्ये तयार करण्यास मदत करते.

**सामाजिक जोडणीचा सिद्धांत :** डॉ. ओकुमुरा म्हणतात, की माणूस एकत्र राहण्यासाठी, एकमेकांना जोडून ठेवण्यासाठी आणि कल्पना शेअर करण्यासाठी बोलू लागला.

**गॉसिप सिद्धांत :** काही तज्ज्ञांच्या मते, भाषेची उत्क्रांती मोठ्या समूहांना जोडण्यासाठी आणि गॉसिपसाठी झाली.

**चॉम्स्कीचा सिद्धांत :** प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ नोम चॉम्स्की यांच्यानुसार, मेंदूत जन्मतःच भाषेशी संबंधित क्षमता असते.

डॉ. नेल्सन म्हणतात, की सत्य हे या सर्वांचे मिश्रण असू शकते. मानव गॉसिप करत होता, एकमेकांशी बोलत होता आणि मेंदू मोठा होत होता.

**प्राचीन कलांमधून भाषेबद्दल काय समजते?**

प्राचीन मानवाच्या अवजारं आणि कलाकृतींमधून भाषेचे गुंतागुंतीचे वर्तन समजते. डॉ. ओकुमुरा म्हणतात, की प्राचीन चित्रे आणि खुणा पाहता त्यातून ओळख, कुटुंब, मित्र आणि गट सांगण्याचा प्रयत्न दिसतो.

**जगात बोलला गेलेला पहिला शब्द काय होता?**

मानवी समूह वाढल्यावर ओळख पटवण्याची गरज निर्माण झाली. यातूनच पहिल्या शब्दाचा जन्म झाला असावा. डॉ. नेल्सन म्हणतात, की काही संशोधकांना आढळले, की व्हेल मासे स्वतःची नावे सांगण्यासाठी आवाज काढतात. त्यामुळे मानवाचा पहिला शब्द असाच ओळख सांगण्यासाठी असावा.

**जगातील पहिली भाषा कशी होती?**

काही तज्ज्ञांच्या मते, भाषेची सुरूवात पूर्व आफ्रिकेतील मानवी उत्क्रांतीच्या सुरूवातीला झाली. डॉ. ओकुमुरा म्हणतात, की काही भाषांमध्ये विशिष्ट आवाज असतात, जे इतरांमध्ये नाहीत. यातूनच भाषेचा विकास झाला असावा.

**आज पृथ्वीवर बोलल्या जाणाऱ्या सर्वांत प्राचीन भाषा कोणत्या?**

मानव पसरल्यावर भाषेत विविधता आली. आज जगात ७,००० हून अधिक भाषा आहेत. लिहिलेल्या सर्वांत जुन्या भाषांमध्ये सुमेरियन, इजिप्शियन आणि अक्केडियन यांचा समावेश आहे. आज वापरात असलेली सर्वांत जुनी भाषा तमीळ मानली जाते (२,५०० वर्षांहून जुनी), जी भारत, श्रीलंका, मलेशिया आणि सिंगापूरमध्ये बोलली जाते. चिनी भाषेची मूळंही हजारो वर्षे जुनी आहेत.

**मानवी भाषेत कशाप्रकारे बदल होतायत?**

समाज गुंतागुंतीचा होत गेल्यावर भाषाही विकसित झाली. डॉ. नेल्सन म्हणतात, की पूर्वज बुद्धिमान होते. अवजारे, फॅशन आणि वर्तन याबाबत संभाषण होते. डॉ. ओकुमुरा म्हणतात, की भाषेमुळे कथा सांगता येतात, कल्पना व्यक्त होता येतात आणि भविष्याबाबत चर्चा करता येते. आज डिजिटल युगात भाषेत वेगाने बदल होत आहेत. नवीन शब्द, इमोजी आणि संकल्पना येत आहेत. तरीही संभाषणाचे मूळ कारण बदलले नाही. एकमेकांशी जोडणे, माहिती आदान-प्रदान आणि समजून घेणे. हे मानवाचे अनोखे वैशिष्ट्य आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# बालसंशोधकांनी जिंकली उपस्थितांची मने

## अ‍ॅड. ललिता पाटील स्कूलमध्ये शालेय विज्ञान प्रदर्शन; तीनशेहून अधिक प्रकल्पांचे सादरीकरण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अ‍ॅड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूल येथे नुकतेच शालेय विज्ञान प्रदर्शनाचे झाले. प्रताप महाविद्यातील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. विजय तुंटे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. संस्थेच्या अध्यक्षा अ‍ॅड. सौ. ललिता पाटील, सचिव प्रा. शाम पाटील, संचालक पराग पाटील, प्राचार्य डॉ. नीरज चव्हाण, प्रा. प्रकाश महाजन आदी प्रमुख पाहुणे होते. सुमारे ३०० प्रकल्पांचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. बाल संशोधकांच्या कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली.

यंदाच्या प्रदर्शनाचे वैशिष्ट्ये म्हणजे विज्ञान विषयांसोबत गणित आणि सामाजिक शास्त्र या विषयावर देखील विद्यार्थ्यांनी विविध प्रकल्प, प्रतिकृती यांचे सादरीकरण केले. त्यात माहिती व तंत्रज्ञान, गणितीय सूत्र, गणितीय आकडेमोड, स्वास्थ्य, आरोग्य, नीटनेटकेपणा, वातावरणीय बदल, सेंद्रिय शेती, बाष्पीभवनावरील प्रयोग, पावसाळ्यातील पाण्याचे योग्य व्यवस्थापन, सौर ऊर्जा प्रकल्प आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी ३०० हून अधिक प्रकल्प सादर केले होते.

प्राचार्य डॉ. नीरज चव्हाण यांनी सांगितले, की विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी. विविध छंद जोपासून कौशल्य दाखवावे. प्रा. डॉ. विजय तुंटे यांनी सांगितले, की विज्ञान, गणित व समाजशास्त्र विषयावर मार्गदर्शन केले. संस्थेच्या अध्यक्षा अ‍ॅड. पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विज्ञान शिक्षक स्वप्नाली धनगर, विशाल सूर्यवंशी, नितेश परब, रश्मी गायकवाड, अमिषा जाधव, श्रद्धा परदेशी, गणित शिक्षक दत्तात्रय जोशी, जावेद पिंजारी, सोनाली कोळी, स्वाती चव्हाण, रवींद्र ठाकरे, विलास पाटील, कमलेश पाटील, किरण पारीख यांनी परिक्षण केले. क्रीडा शिक्षक केदार देशमुख, सागर चावरीया, रमेश धनगर, ममता पाटील, कलाशिक्षक गणेश सातपुते आदींनी सहकार्य केले. मुस्कान डिंगरे व रश्मी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. ▲




## बाल्यावस्थेतील भीमसेन जोशींनी गायलेले वंदेमातरम् आजही स्मरणीय..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भीमसेन नऊ वर्षाचा झाला तेव्हा बाबांनी त्याला एक पेटी विकत घेऊन दिली. पहिला गुरु होता 'अगसरू' अगसरू म्हणजे परीट! हुलुकोटी गावाच्या त्या धोबी बांधवाचे नाव होते चन्नाप्पा. सांगलीच्या इनायत खाँकडून तो व्यवस्थित शास्त्रीय संगीत शिकला होता. पंचाक्षरी बुवांचीही तालीम त्याला मिळाली होती. चार रुपये महिन्यावर त्याची शिकवणी सुरू झाली. भीमसेनची ग्रहणशक्ती पाहुन चन्नाप्पा चकीत झाला. काही महिन्यातच पंधरा- वीस रागांशी भीमसेनने तोंड ओळख करून घेतली. भीमसेन शाळेत आणि मंदिरात जात होताच. आता त्याच्या गाण्याला शास्त्रीय संगीताचा पाया लाभला होता. गदग (कर्नाटक) गाव त्याला बालनायक म्हणुन ओळखू लागले होते. १९३१मध्ये गांधीजींनी 'दुसरी असहकार चळवळ) घोषीत केली होती. भारतीय जनतेत एक प्रकारची अनामिक, भयमिश्रीत सळसळ निर्माण झाली होती. गदगला सभा घेण्यासाठी जवाहरलाल नेहरू येणार होते. त्यांच्या भाषणापूर्वी वंदे मातरम्चे गायन होणार होते. ते राष्ट्रगीत बालक भीमसेन गाव असे गदगवासियांनी एकमुखाने ठरवले. सभा झाली आणि भीमसेनने वंदे मातरम्चे अप्रतिम गायन केले. त्याच्या बाबांच्या आनंदाला त्यावेळी उधाण आले होते. वंदे मातरम् हे केवळ एक गाणे नसून, भारतमातेचे (मातृभुमीचे) स्त्रोत आहे. ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे प्रतीक बनले होते. १५० पेक्षा वर्षांपेक्षा जास्त जुने असूनही, हे गीत आजही देशाच्या सामुहिक चेतनेचा आणि स्वाभिमानाचा अविभाज्य भाग आहे. याचे प्रथम सादरीकरण १८९६ मध्ये (स्व.) रवींद्रनाथ टागोर यांनी काँग्रेस अधिवेशनात केले होते. मात्र, त्याला संविधान सभेने २४ जानेवारी १९५० रोजी राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले. याला राष्ट्रगीताइतकेच महत्व आहे. आज जे वंदे मातरम् गायले जाते ती रचना पंडित विष्णू दिगंबर पलूस्कर यांची आहे. ही रचना (गीत) भीमसेनला भारताच्या भावी पंतप्रधानांसमोर वयाच्या नवव्या वर्षी सादर करण्याचा आगळाच सन्मान लाभला होता. याच पं. भीमसेन जोशी यांना २००८ मध्ये भारतरत्न पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले. ▲

**– शरद आ. सोनवणे,**
**९४२०१०८३०५**



# होमगार्ड बांधवांना ३६५ दिवस काम मिळावे

## अमळनेरला तिमाही संमेलनात मागणी; विविध विषयांवर सकारात्मक चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात अमळनेर, धरणगाव, पारोळा व चोपडा तालुक्यातील होमगार्ड बांधवांचे तिमाही संमेलन झाले.

३६५ दिवस कायमस्वरूपी काम मिळावे. तीन वर्षांची पुनर्नियुक्ती पद्धत बंद करावी, विमा सुविधा, टी.ए., डी.ए. मिळावे. तालुका समादेशकांची किमान पाच वर्षांसाठी नियुक्ती करण्यात यावी, आदी मागण्या करण्यात आल्या.

विशेष कामगिरी केलेल्या होमगार्डचे कौतुक करण्यात आले.यावेळी होमगार्ड बांधवांची मोठी उपस्थिती होती. होमगार्ड विभागाचे जिल्हा समादेशक तथा अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, प्रशासकीय अधिकारी रामनाथ काळे, जिल्हा केंद्र नायक गंगाधर महाजन, जिल्हा पलटण नायक मदन रावते, वरीष्ठ लिपिक पंकज नेरकर, कानिष्ठ लिपिक रितेश पाटील, शिपाई हेमंत माळी, अमळनेर प्रभारी समादेशक अधिकारी गोपाल वना पाटील, पारोळा प्रभारी समादेशक अधिकारी अरुण पाटील, चोपड्याचे साजिद सैय्यद शेख, संजीव सोनवणे, धरणगावचे प्रभारी समादेशक अधिकारी ईश्वर महाजन व पलटण नायक ईश्वर पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

पोलीस महासंचालक (मुंबई) यांच्या मागणीनुसार होमगार्डना विविध कर्तव्यांवर तैनात करण्यात येते. होमगार्डच्या कामकाजात येणाऱ्या अडचणी, समस्या व त्यावरील उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हा समादेशक अशोक नखाते यांनी उपस्थित होमगार्डच्या सर्व समस्या व तक्रारींची दखल घेतली आहे. सर्व समस्यांबाबत मुंबई येथील महासमादेशकांकडे अहवाल पाठविण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. संमेलनासाठी पत्रकार संघाचे अध्यक्ष चेतन राजपूत यांनी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह मोफत उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचा ऋणनिर्देश करण्यात आला. प्रभारी तालुका समादेशक गोपाल वना पाटील, कैलास पाटील, भीमराव संदानशिव, विष्णू पाटील आदींनी सहकार्य केले. ▲



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

### पान १ वरून

सांगण्यात आलेले होते.

**बाळा नांदगांवकरांनी पोस्टमध्ये काय म्हटले?**

"मतभेद असावे, मनभेद नसावे. राज्यातील ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ साहेब यांची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली. त्यांच्यावर नुकतीच शस्त्रक्रिया झाली. यावेळी त्यांच्याबरोबर जुन्या आठवणींना उजाळा दिला. शिवसैनिक म्हणून काम करत असताना भुजबळ साहेब हे आमचे ज्येष्ठ नेते होते. दोघांमधील सारखा दुवा म्हणजे "ठाकरे परिवार". दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्याने त्यांनीही मनापासून आनंद व्यक्त केला. त्यांची आणि माझी राजकीय विचारधारा नंतरच्या काळात वेगळी असली तरी ज्येष्ठ नेते म्हणून त्यांच्याबद्दल मनात आदरच आहे. वयाच्या या टप्प्यात ही त्यांचा सगळ्यात मोठा गुण म्हणजे त्यांचा लढवय्या स्वभाव. अनेकदा प्रवाहाविरोधात जाऊन लढणारे भुजबळ साहेब वयाच्या या टप्प्यात ही लढवय्ये आहेत."

"मा बाळासाहेब व एकूणच ठाकरे परिवारातील जुन्या आठवणी, आधीच्या काळातील केलेला संघर्ष त्यातून मिळविलेले यश, राजकारणाची बदलेली शैली याबद्दल ते मनापासून व्यक्त झाले. हॉस्पिटल मध्ये असले आणि शस्त्रक्रिया झाली तरी एकदम मनापासून ते व्यक्त होत होते. आम्ही दोघेही जुन्या गोष्टी आठवून भाऊक झालो. आपल्या राज्याची संस्कृती आहे, की आपल्या येथे राजकीय विरोधक असतात पण दुश्मन नव्हे. कारण राजकारणात मतभेद असावे पण मनभेद नसावे. ही संस्कृती हळूहळू लुप्त होत आहे असे सध्या जाणवते आहे. राजकारणातील धडधडती तोफ म्हणून ओळखले जाणारे भुजबळ साहेब हे लवकरात लवकर स्वस्थ होऊन परत सक्रीय व्हावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना. – बाळा नांदगावकर", अशी पोस्ट त्यांनी लिहली आहे. ▲



# केवळ ४२ कर्मचारी चालवितात ६३ हजार कोटींची कंपनी

## ओन्लीफॅन्सच्या सीईओ म्हणाल्या, आम्ही फक्त त्यांनाच नोकरी देतो, जे...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगभरात ४० लाख कंटेंट क्रिएटर्स आणि सुमारे ६३ हजार कोटींचे उत्पन्न असलेल्या लोकप्रिय स्ट्रिमिंग प्लॅटफॉर्म ओन्लीफॅन्सचे कामकाज केवळ ४२ कर्मचाऱ्यांच्या जोरावर चालते. याबाबत कंपनीच्या सीईओ केली ब्लेअर यांनी खुलासा केला आहे.

लिस्बनमधील नोव्हेंबर वेब समिट या तंत्रज्ञान परिषदे दरम्यान जेफ बर्मन यांच्याशी बोलताना, ओन्लीफॅन्सच्या सीईओ केली ब्लेअर यांनी सांगितले, की ओन्ली फॅन्समध्ये फक्त अत्यंत अनुभवी ज्येष्ठ प्रतिभावान कर्मचाऱ्यांना आणि महत्त्वाकांक्षी कनिष्ठ प्रतिभावान कर्मचाऱ्यांना नोकरी दिली जाते. ही निवड करताना त्यांच्या अनुभवापेक्षा कौशल्याला प्राधान्य दिले जाते. या दृष्टिकोनामुळे कंपनी कार्यक्षमतेने काम करू शकते. जेथे प्रत्येक कर्मचारी स्वतंत्रपणे योगदान देत असतो.

२०१६ मध्ये स्थापन झालेली ओन्लीफॅन्स कंपनी वार्षिक सुमारे ७ अब्ज डॉलर्सचा (सुमारे ६३ हजार कोटी) महसूल मिळवते. याबाबत बिझनेस इनसाइडरने वृत्त दिले आहे. कॉर्पोरेट कंपन्यांच्या पारंपरिक नियमांना आव्हान देत केली ब्लेअर यांनी नेतृत्त्वाचे मूल्यांकन त्यांच्या कंपनीच्या कर्मचारी संख्येवरून केले पाहिजे ही कल्पना फेटाळून लावली आहे. वैयक्तिक योगदान देणारे लोकही सर्वोत्तम कामगिरी करू शकतात, असा त्यांचा विश्वास आहे. त्या पुढे म्हणाल्या, की आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांना सांगितले आहे की, तुमच्या टीममध्ये तुम्ही एकटेही असू शकता आणि अशा परिस्थितीतही तुम्ही सर्वोत्तम कामगिरी करू शकता, ज्याची दखल घेतली जाते. ▲

### काय आहे ओन्लीफॅन्स?

ओन्लीफॅन्स हा २०१६ मध्ये सुरू झालेला एक कंटेंट सबस्क्रिप्शन प्लॅटफॉर्म आहे. यावर क्रिएटर्सना त्यांचा कंटेंट (फोटो आणि व्हिडिओ) थेट प्रेक्षकांना शेअर करता येतो. याबदल्यात क्रिएटर्स प्रेक्षकांकडून मासिक शुल्क आकारतात. ओन्लीफॅन्स क्रिएटर्सना त्यांच्या कंटेंटसाठी किती शुल्क आकारायचे हे ठरवण्याची मुभा देते. मात्र, क्रिएटर्सना त्यांचे शुल्क दरमहा ४. ९९ डॉलर्स ते ४९. ९९ डॉलर्स कासले पाहिजे. यात युद्धकालातील रक्कम क्रिएटर्सना मिळते. तर ओन्लीफॅन्स २० टक्के कमिशन घेते.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# समाजजागृतीचे प्रतीक : संत जगनाडे महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संतपरंपरेत अनेक संतांनी समाजमनावर अविस्मरणीय ठसा उमटविला आहे. त्यात संत जगनाडे महाराजांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. ज्ञान, भक्ती, श्रम, समता आणि निःस्वार्थ सेवाभाव या मूल्यांची दीपशिखा त्यांनी आपल्या कार्यातून उंचावली. आज १७ डिसेंबर अर्थात त्यांची पुण्यतिथी. यानिमित्ताने त्यांच्या बहुआयामी कार्याचा, समाजसेवेचा आणि संतपरंपरेतील योगदानाचा विचार करणे म्हणजे आपल्या संस्कृतीचा आत्मा समजून घेण्याचा प्रयत्नच होय.

**संत जगनाडे महाराजांचे जीवन व प्रेरणा**

संत जगनाडे महाराजांचा जन्म साधेपणात आणि श्रमजीवी कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांच्यातील परिश्रमशीलता, सत्यनिष्ठा आणि सहकार्यभाव दिसून येत होता. आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण त्यांनी समाजोन्नतीसाठी वाहिला. संत तुकाराम महाराजांनी दिलेल्या ज्ञानमार्गाचा आणि कीर्तनपरंपरेचा त्यांनी अंगीकार करून अनेकांना सद्मार्गाला लावले.

**समाजजागृतीतील योगदान**

संत जगनाडे महाराजांनी समाजातील अन्याय, विषमता, अंधश्रद्धा यावर निर्भीडपणे आवाज उठविला. ' श्रम हेच पूजन ' आणि ' समता हेच खरे धर्म ' ही त्यांची शिकवण आजही समाजाला



मार्गदर्शन करणारी आहे. त्यांनी दिलेल्या काही मुख्य शिकवणी पुढीलप्रमाणे–

**श्रमाला प्रतिष्ठा देणारी विचारप्रणाली**

– शिक्षण, प्रामाणिकपणा आणि आत्मसुधार यांचे महत्त्व.
– जातिभेदाऐवजी मानवतेचा पुरस्कार.
– स्त्रीपुरुष समानतेचा संदेश.

त्यांची वाणी साधी, परंतु अर्थगर्भ होती. त्यांनी कीर्तन, प्रवचन आणि व्यक्तिगत संवादाच्या माध्यमातून नैतिकता, सदाचार आणि भक्तीची कास धरण्याची प्रेरणा दिली.

**भक्ती आणि कीर्तनपरंपरा**

संत जगनाडे महाराजांच्या कीर्तनातील प्रभाव हा त्यांच्या आत्मीय भाषेमुळे होता. ते भक्तीला केवळ धार्मिक आचरण मानत नसून ती समाजपरिवर्तनाची शक्ती आहे, असा त्यांचा दृढविश्वास होता. विठ्ठलभक्तीच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य माणसाला जीवनमूल्यांची जोड दिली. त्यांचे कीर्तन म्हणजे आत्मपरिक्षणाचा आरसा आणि सदाचारी जीवनाचा मार्गदर्शकच ठरले.

**संस्कार व आदर्श**

संत जगनाडे महाराजांचे जीवन म्हणजे व्यवहारातील अध्यात्म. त्यांनी सांगितलेली मूल्ये आजच्या झपाट्याने बदलणाऱ्या जगात तितकीच आवश्यक आहेत. नैतिकता, करुणा, प्रामाणिकपणा आणि समाजाप्रती कर्तव्यभाव या गुणांनी त्यांनी आदर्श स्थापित केला. त्यांचा वारसा पुढील पिढ्यांना मानवतेचा संदेश देत राहिला आहे. त्यांच्या शिकवणी आजही समाजजागृतीचे दीपस्तंभ म्हणून कार्यरत आहेत.

**पुण्यतिथीचे महत्त्व**

संत जगनाडे महाराजांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांचे विचार स्मरणात आणणे म्हणजे फक्त संतस्मरण नव्हे, तर जीवनात आदर्शांचे रोपण करण्याचा प्रयत्न आहे. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी समाजसेवा, पर्यावरण संवर्धन, शिक्षण प्रसार, समानतेचा संदेश या उपक्रमांना ऊर्जा देणे हेच खरे संतांना अभिवादन ठरेल. दै. ' ग्लोबल महातेज ' परिवारातर्फे विनम्र अभिवादन!



# मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एका मोठ्या शहरात भगवान विष्णू यांचे मोठे मंदिर होते. रोज अनेक भक्त त्या मंदिरात दर्शनासाठी येत असत. हळूहळू मंदिराची ख्याती वाढू लागली, भक्तांची गर्दी होऊ लागली, मंदिराचा विस्तार होऊ लागला. मग काही लोकांनी ठरविले, की भगवान विष्णू यांना एक सोन्याचा मुकुट करावा. त्यासाठी निधी गोळा करण्याचे ठरविले. गावाच्या बाजूलाच एक अनाथ, अपंग मुलांचा आश्रम होता. त्या आश्रमालाही गावातील काही लोक दानधर्म करत.

भिकूशेठ नावाचे एक श्रीमंत सावकार गावात राहत होते. भिकूशेठ आपल्या पैशातून, नफ्यातून काही वाटा हा दानधर्मासाठी वापरत असत. भक्तमंडळींना वाटले, की भिकूशेठसारखा दिलदार मनाचा माणूस आपल्याला मदत करेल. सगळे मिळून भिकूशेठकडे गेले. भक्तमंडळींना आपल्या पेढीवर आलेले पाहून भिकूशेठला मोठा आनंद झाला. त्यांनी भक्तांचा मोठा आदर सत्कार केला. लोकांनी भगवान विष्णू यांच्यासाठी सोन्याचा मुकुट करण्याचे सांगितले व भिकूशेठ यांच्याकडून मदतीची मागणी केली. यावर भिकूशेठ म्हणाले, की ' मंडळी मी तुमच्या कामात काही मदत करू शकत नाही. कारण मी भगवान विष्णू यांना सोन्याचा मुकुट करण्यापेक्षा चांदीचे पाय करण्याचा विचार करत आहे. ' लोक म्हणाले, की ' आम्हाला निश्चित काय ते खरे सांगा. ' भिकूशेठ यांनी सर्वांना दोन दिवसांनी येण्यासाठी सांगितले. दोन दिवस निघून गेले. लोक पुन्हा भिकूशेठच्या पेढीवर गेले असता भिकूशेठ यांच्या शेजारी एक लहान मुलगा बसला होता. भिकूशेठ यांनी त्या मुलाला उठायला सांगितले. त्या मुलाला दोन्ही पाय नव्हते. मग भिकूशेठ यांच्या नोकराने एका पेटीतून दोन वस्तू काढल्या. ते कृत्रिम पाय होते. ते त्या नोकराने त्या अपंग मुलाला व्यवस्थितपणे बसविले. मुलगा हळूहळू चालू लागला.

भिकूशेठ म्हणाले, की ' भक्तांनो, या मुलाचे नाव विष्णू. हा अपंग असून अनाथ आहे. याला पाय नव्हते म्हणून मी शहरातून हे पाय विकत आणले. तो आता हिंडू-फिरू शकतो. त्या भगवान विष्णू यांना सोन्याच्या मुकुटाचा तसा फारसा उपयोग नव्हता. पण या विष्णूला पायांची गरज होती. मी याला दिलेले कृत्रिम पाय याच्या दृष्टीने सोन्या-चांदीपेक्षा जास्त महत्त्वाचे आहेत. '

# ॐ चा अर्थ काय? ॐ म्हणजे काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एक प्रयोग करून पाहा. जीभ न हलवता कोणताही अक्षर बोलण्याचा प्रयत्न करा. काय झाले ते सांगा. आ, ऊ, म, हे मुख्य तीन अक्षरच बोलता येतात. हे तीन अक्षर एकत्र केल्यावर तयार होतो ॐ. एखादा गुंगा व्यक्ती, बोलता न येणारा माणूस काय बोलत असतो फक्त हेच अक्षर उच्चारतो म्हणून ॐ ची व्याप्ती खूप मोठी आहे. जेव्हा काही नव्हते तेव्हाही ॐ होते.

जेव्हा नव्हती पृथ्वी, नव्हती ब्रह्मांड, नव्हते त्रिदेव तेव्हाही फक्त ॐ होते. जेव्हा शिवलिंगमधून ब्रह्मदेव तसेच भगवान विष्णूदेव तसेच महादेव निर्मित झाले तेव्हा त्यांच्या कानावर एकच अक्षर पडले ते म्हणजे ॐ. तेव्हा त्यांनी हजारो वर्षे ॐ या



मात्रांचा जप करून तपस्या केली. तेव्हा त्यांना स्वतःचा परिचय झाला तसेच सृष्टी निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली.

**मंत्र**

**ॐ गं गणपतेय नमः।**
**ॐ नमः शिवाय।**
**ॐ भुंवः भुवः स्वः**
तत्सवितुर्वरेण्यं ।भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात् ॥

प्रत्येक मंत्रामध्ये आपल्याला ॐ पाहायला दिसतो. त्याशिवाय मंत्र सुद्धा पूर्ण होत नाही. हिंदू धर्म तसेच सर्व धर्मांमध्ये ॐ याला आपापल्या दृष्टिकोनने पूज्य मानतात व साधनेचा साधन म्हणून उपयोग करतात. ॐ च्या आवाजाने अनेक रोग बरे होतात. सकारात्मक ऊर्जा तयार होते, नकारात्मक ऊर्जा दूर जाते. तसेच ॐ च्या कंपननेच शरीरात खूप फायदा होतो. हवे तर ट्राय करून बघा.

# आईच्या उजव्या अंगठ्याचे चरणतीर्थ का घ्यावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आईच्या उजव्या अंगठ्याच्या चरणतीर्थाचे फार महत्त्व आहे. त्यामागे वैज्ञानिक कारणही सांगितले जाते. आई-वडील, गुरूंचे चरणस्पर्श जितके महत्त्वाचे किंबहुना त्याहीपेक्षा महत्त्वाचे त्यांचे चरणतीर्थ आहे. या क्रियेला संशोधनातून शास्त्रीय कारण आहे.

जगातील प्रत्येक वस्तू अणुपासून बनलेल्या असतात. त्यात प्रोटॉन, इलेक्ट्रॉन, न्यूट्रॉन हे घटक असतात. प्रोटॉनवर + भार, इलेक्ट्रॉनवर – भार, तर न्यूट्रॉनवर कोणताच भार नसतो. मानवी शरीर अणुपासूनच बनलेले असते. म्हणून मानवी शरीरात +,– हे दोनही ही भार असतात. मानवी शरीरातील अणु स्वतःमध्ये +, – भार घेऊन संपूर्ण शरीरात भ्रमण करतात. व्यक्तीच्या मनातील चांगल्या भावना पॉझिटिव्ह, तर वाईट भावना निगेटिव्ह भार दर्शवितात. विज्ञान सांगते, की अणु एका वस्तूतून किंवा एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जाऊ शकतात. प्रत्येक पाल्यासाठी त्याचे आई-वडील शुभाशीर्वाद देतात व चांगल्या भावना व्यक्त करतात. + भार आणि – भार आयन पाण्यात विरघळतात. मानवी शरीरातील + व – आयन पायाच्या अंगठ्यातून निर्मित होतात. असे आयन पाण्यात विरघळून प्राशन केले, तर आपल्या कार्यक्षमतेत असाधारण वाढ होऊ शकते.

**चरणतीर्थ घेण्याची योग्य पद्धत**

आई-वडील, गुरुजनांच्या पायाच्या उजव्या अंगठ्यावर १ किंवा २ चमचे पाणी टाकून, पाणी टाकताना क्षणभर स्वतःच्या हाताच्या बोटांनी अंगठ्याला स्पर्श करून मग ते पाणी तीर्थ म्हणून घ्यावे.



# पद्मनाभस्वामी मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पद्मनाभस्वामी मंदिर भारत के केरल राज्य के तिरुअनन्तपुरम में स्थित भगवान विष्णु का प्रसिद्ध हिन्दू मंदिर है। भारत के प्रमुख वैष्णव मंदिरों में शामिल यह ऐतिहासिक मंदिर तिरुअनंतपुरम के अनेक पर्यटन स्थलों में से एक है। पद्मनाभ स्वामी मंदिर विष्णु-भक्तों की महत्वपूर्ण आराधना-स्थली है। मंदिर की संरचना में सुधार कार्य किए गए जाते रहे हैं। उदाहरणार्थ १७३३ ई. में इस मंदिर का पुनर्निर्माण त्रावनकोर के महाराजा मार्तड वर्मा ने करवाया था। पद्मनाभ स्वामी मंदिर के साथ एक पौराणिक कथा जुडी है। मान्यता है कि सबसे पहले इस स्थान से विष्णु भगवान की प्रतिमा प्राप्त हुई थी जिसके बाद उसी स्थान पर इस मंदिर का निर्माण किया गया है।

श्री पद्मनाभस्वामी मंदिर के गर्भगृह में भगवान विष्णु की विशाल मूर्ति विराजमान है जिसे देखने के लिए हजारों भक्त दूर दूर से यहाँ आते हैं। इस प्रतिमा में भगवान विष्णु शेषनाग पर शयन मुद्रा में विराजमान हैं। मान्यता है कि तिरुअनंतपुरम नाम भगवान के ' अनंत ' नामक नाग के नाम पर ही रखा गया है। यहाँ पर भगवान विष्णु की विश्राम अवस्था को 'पद्मनाभ' कहा जाता है और इस रूप में विराजित भगवान यहाँ पर पद्मनाभ स्वामी के नाम से विख्यात हैं।

# रामधान्य



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान प्रभू श्रीरामचंद्र यांनी रावणाचा पराभव केला आणि ते अयोध्येला जायला निघाले. वाटेत गौतम ऋषींचा आश्रम लागला. त्यामुळे श्रीराम, लक्ष्मण आणि सीतामाई त्यांना भेटायला गेले. गौतम ऋषींनी त्यांचे प्रेमाने स्वागत केले. भगवान प्रभू श्रीरामचंद्र विजयी होऊन आले होते म्हणून गौतम ऋषींनी खास मेजवानीचे आयोजन केले होते. जेवणात प्रत्येक धान्यापासून बनविलेल्या एकेका पदार्थाचा समावेश होता. जेवताना गौतम ऋषी भगवान प्रभू श्रीरामचंद्र यांना प्रत्येक धान्याची माहिती देत होते, त्यांचे गुणदोष सांगत होते. शेवटी ते म्हणाले, की ' या सर्व धान्यांमध्ये नाचणी सर्वश्रेष्ठ आहे. ' हे ऐकताच तांदळाला राग आला. तो तेथे प्रकट झाला आणि त्याने नाचणीला हिणवायला सुरूवात केली. ' म्हणे नाचणी सर्वश्रेष्ठ. आहे काय त्या नाचणीत? ना रंग ना रूप. छोटे-छोटे दाणे आणि काळा-सावळा रंग. कशी वेडीबिद्री दिसते. ' ' मी हंसासारखा पांढराशुभ्र आहे. मला तर फुलासारखा सुगंध येतो. म्हणून लग्नात, इतर मंगलकार्यात अक्षता म्हणून मिरविण्याचा मान माझाच. म्हणून मीच धान्यांत श्रेष्ठ. ' हे ऐकून नाचणीचाही संयम सुटला. तिनेही आपली बाजू लावून धरली. ' मी नसेन दिसण्यात सुंदर. पण गरीब असो किंवा श्रीमंत मी भेदभाव न करता सगळ्यांचे पोट भरते. ' शब्दाने शब्द वाढत जातो. शेवटी या दोघांत श्रेष्ठ कोण? हे ठरविण्याची जबाबदारी प्रभू श्रीरामचंद्रांवर येऊन पडते.

प्रभू श्रीरामचंद्र म्हणतात, की ' मी गेली १४ वर्षे घरापासून लांब आहे. मला घरी जायची ओढ लागली आहे. तेव्हा मी आधी अयोध्येला जातो. तेथे जाऊन मी ६ महिन्यांनी परत येईन आणि मग माझा निर्णय देईन. पण तोपर्यंत तांदूळ आणि नाचणी दोघांना ६ महिने तुरुंगात डांबून ठेवण्यात यावे.' प्रभू श्रीरामचंद्र अयोध्येला निघून जातात आणि इकडे तांदूळ व नाचणीची रवानगी तुरुंगात होते. ६ महिन्यांनी जेव्हा प्रभू श्रीरामचंद्र परत येतात तेव्हा या दोघांना तुरुंगातून बाहेर काढतात. तांदूळ खराब झालेला असतो आणि त्याला कीड लागलेली असते. नाचणी मात्र जशी असते तशीच बाहेर येते.

हे बघून प्रभू श्रीरामचंद्र म्हणतात, की ' तांदूळ आणि नाचणी दोघांवरही सारखीच आपत्ती कोसळली. पण तांदूळ खराब झाला आणि नाचणी तशीच राहिली, म्हणून ते आपले मत नाचणीच्या पारड्यात टाकतात. ' या प्रसंगानंतर राघवाचा जिच्यावर ' अनुराग ' (प्रेम) आहे ती ' रागी ' असे नवीन नाव नाचणीला मिळाले. तांदूळ आणि नाचणीच्या भांडणाची ही गोष्ट कानडी संत ' कनकदास' यांच्या ' रामधान्यचरित्र ' या काव्यात सांगितलेली आहे. ' माणसाचे चारित्र्य त्याच्या जन्मावरून, रंग-रूपावरून न ठरवता त्याचे विचार कसे आहेत आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कठीण प्रसंगात तो कसा वागतो यांच्यावरून केली पाहिजे. ' हे आपल्याला या कथेतून शिकायला मिळते.

# समर्थ रामदासांची अनुभूती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकदा समर्थ रामदास स्वामी हे पुरंदर किल्ल्यावरून चाफळला जाताना जेजुरीवरून चालले होते. तेवढ्यात एक धनगर घोड्यावरून समर्थांसमोर आला. त्याने समर्थांचे दर्शन घेतले व म्हणाले, की ' महाराज खंडोबाच दर्शन घेऊन जा. ' तेव्हा समर्थ हसून म्हणाले, की ' अरे बाबा, मी प्रभू श्रीरामचंद्रांचा सेवक आहे. मी प्रभू श्रीरामचंद्रांव्यतिरिक्त इतरांना प्रभू श्रीरामचंद्र स्वरूपातच पाहतो. तुझ्या खंडोबाला येथूनच नमस्कार करतो. आता गड चढायला मला जमणार नाही. ' त्यावर तो धनगर म्हणाला, की ' अहो महाराज, तुमच्या प्रभू श्रीरामचंद्रांनी प्रत्येक वेळी शिवलिंग स्थापून भगवान शिव यांची मनोभावे पूजा केली. त्या प्रभू श्रीरामचंद्रांच्या दैवताला तुम्ही दर्शन घेणार नाही म्हणता, हे जरा अचंबित करणारे आहे. ' हे त्या धनगराच्या मुखातील शब्द ऐकून समर्थ चमकले. मनात विचार केला, की ही माझ्या प्रभू श्रीरामचंद्रांची आज्ञा दिसत आहे. हे पाहून नाईलाजाने धनगराच्या घोड्यावर बसून वर जेजुरी गडावर आले. त्यावर धनगर म्हणाला, की ' महाराज, तुम्ही दर्शन घ्या. मी घोडा बांधून येतो. ' समर्थ रामदास स्वामी मंदिरात गेले तेथे



खंडोबाचे लिंग पाहून महाराजांचे मन प्रसन्न झाले. त्यांच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले. अंगाला कंप सुटला. वाणी सद्गदित झाली आणि त्यांच्या मुखातून शब्द निघाले, की

' पंचानन हयवाहन सुरभूषित निळा।
खंडा मंडित दंडित दानव अवलिळा ।
मणी मल्ल मर्दुनीया धूसर पिवळा ।
हिरे कंकण बाशींगे सुमनाच्या माळा ॥
जय देव जय देव जय शिवमल्हारी
। वारी दुर्जन वारी निंदका पहारी जय देव ॥

पुढे म्हणतात, की रघुवीर नामस्मरणे हृदयी शंकर निवाला । **तो हा मदनांकीत अवतार झाला ।**
**यालागे आवडे भावे वर्णिला । रामी रामदासा जीवलग भेटला ॥**

म्हणजे प्रभू श्रीरामचंद्र यांचा भक्त असून प्रभू श्रीरामचंद्रांचे नाव घेत असताना माझ्या हृदयात प्रत्यक्ष भगवान शंकर अवतरले. ही अनुभूती समर्थांना आली. दर्शन घेऊन बाहेर येतात, तर तो घोडाही नाही आणि तो धनगरही नाही. समर्थांनी ओळखले, की प्रत्यक्ष श्री खंडोबा समर्थांना गडावर घेऊन आले होते. मी देवाला कष्ट दिले याचे समर्थांना फार वाईट वाटले. हीच खंडोबाची आरती सर्व महाराष्ट्रभर प्रचलित आहे.

जय जय रघुवीर समर्थ..!

(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)